राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचपयत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२२.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ९ जून, २०२२.

प्रति,

जिल्हाधिकारी,
अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर,
लातूर, अमरावती व चंद्रपूर.

विषय:- राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम-२०२२.

संदर्भ:
१) आयोगाचे क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का-६, दि.२७/१२/२०२१ रोजीचे आदेश.
२) राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांचा दि.२२/०२/२०२२ रोजीचा प्रभाग रचना कार्यक्रम.
३) मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र.१९७५६/२०२१ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि.०४/०५/२०२२ रोजीचे आदेश.
४) राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांचा दि.०६/०५/२०२२ रोजीचा प्रभाग रचना सुधारित कार्यक्रम.
५) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांचे दि.०७/०६/२०२२ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त संदर्भाधीन क्र. ४ येथील पत्रान्वये राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी "क" वर्गातील १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार प्रभाग रचनेचा सुधारित कार्यक्रम दिला होता. तसेच आयोगाच्या संदर्भाधीन क्र. ५ येथील पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून अंतिम प्रभाग रचना दि.०९/०६/२०२२ पर्यंत प्रसिध्द करण्यात येणार आहे.

२. आणि ज्याअर्थी, सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, दिनांक ११ मार्च, २०२२ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी, अधिनियमामध्ये सुधारणा केल्यानंतर प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्तांच्या मान्यतेने राज्य शासनाने करण्याची तरतूद करण्यात आली होती. सदर सुधारणेस अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाने दि.२२/०२/२०२२ च्या आदेशानुसार राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी **"क"** वर्गातील १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमाबाबत पुढील कार्यवाही अधिनियमातील नवीन तरतूदीनुसार राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे करण्यात यावी असे आयोगाने संबंधित जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून) यांना दि.१४/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते.

३. आणि त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने SLP क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेल्या आदेशात असेही नमूद केले आहे की, जो पर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही, तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागावर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाही. मा सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशातील निर्णया नुसार आरक्षण ठरविण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने सोबतच्या **परिशिष्ट-२** मध्ये नमूद केलेल्या नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

## आदेश

**आरक्षण व सोडत :-**

i) राज्यातील १ नगरपरिषद व ९ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी **परिशिष्ट-१** नुसार आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम देण्यात येत आहे. त्यानुसार अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला व सर्वसाधारण महिला यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

ii) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार कमीत कमी A४ या आकाराचा असावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

iii) प्रभागरचना आणि आरक्षण राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र.क्र.१०/का.६, दिनांक २७/१२/२०२१ नुसार करावी. या आदेशानुसार विहित केलेल्या परिशिष्ट १ ते १४ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना करावी.

iv) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगर परिषद/नगरपंचायतींच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या संकेत स्थळावर इत्यादी

(v) प्रारूप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगर परिषद/ नगरपंचायतींच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(vi) सोडतीच्यावेळी अंतिम प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुःसिमा,सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.

(vii) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी पासून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता **उपजिल्हाधिकारी** दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम **फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी** यांचे उपस्थितीत घ्यावी.

४. राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिशिष्ट-२ मधील नमूद नगरपरिषदांबाबत प्रभाग रचना करण्यास बाधा येणारी कोणतीही बाब जसे न्यायालयीन प्रकरण इ.बाबतची माहिती त्वरीत आयोगास अवगत करावी.

५. **प्रसिध्दीबाबत :-** निवडणूक प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवरील माहिती नगरपरिषद/नगरपंचायतींनी वेळोवेळी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील. तसेच प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास तात्काळ सादर करावा.

६.	राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक तसेच ई-मेल पुढीलप्रमाणे आहे:-

दूनध्वनी क्रमांक :- २२०४५०७५ / २२०२७७३७ / २२८४६७२०

ई-मेल :- sec.mh@gov.in

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट- १ व २

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी:-**

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन
४. संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीचे प्रशासक व मुख्याधिकारी.
५. संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई.
६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने.
७. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.
८. निवड नस्ती/कार्या-६.

# आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२२
## परिशिष्ट -१ (नगरपरिषद/नगरपंचायतींसाठी)

**राज्यातील मुदत समाप्त झालेली १ नगरपंचायत, माहे जून-२०२२ मध्ये मुदत समाप्त होणारी १ नगरपरिषद, ४ नगरपंचायती व नवनिर्मित ३ नगरपंचायती अशा एकूण ९ नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम -२०२२.**

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-०६, दि.०९/०६/२०२२ सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा /संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे (जिल्हाधिकारी व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या वेबसाईटसह) | जिल्हाधिकारी | १०/०६/२०२२ (शुक्रवार) |
| २. | नगर परिषदांच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला व सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १३/०६/२०२२ (सोमवार) |
| ३. | आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद/नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | १५/०६/२०२२ (बुधवार) |
| ४. | आरक्षण व सोडतीच्या अनुषंगाने हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | जिल्हाधिकारी | १५/०६/२०२२ (बुधवार) ते २१/०६/२०२२ (मंगळवार) पर्यंत |
| ५. | आरक्षण व सोडतीचा अहवाल संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन यांच्याकडे पाठविणे. | जिल्हाधिकारी | २४/०६/२०२२ (शुक्रवार) पर्यंत |
| ६. | नगरपरिषद/नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या आरक्षणास मान्यता देणे. | संबंधित विभागीय आयुक्त | २९/०६/२०२२ (बुधवार) पर्यंत |
| ७. | सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना कलम १० नुसार रहिवाश्यांच्या माहितीसाठी वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०१/०७/२०२२ (शुक्रवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगरपरिषद/नगरपंचायतींच्या आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# परिशिष्ट -२

## नगर परिषद/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका-२०२२

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.३/का-६, दि. ०९/०६/२०२२ सोबतचे सहपत्र)

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | नगर परिषद/नगरपंचायतींचे नावे | मुदत समाप्तीचा/स्थापनेचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अहमदनगर | नेवासा न.पं. | १८/०६/२०२२ |
| २ | पुणे | मंचर न.पं. | नवनिर्मित (२९/११/२०२१) |
| ३ | सातारा | मेढा न.पं. | ०९/०६/२०२२ |
| ४ | सांगली | शिराळा न.पं. | १४/०६/२०२२ |
| ५ | सोलापूर | अनगर न.पं. | नवनिर्मित (०१/११/२०२१) |
| ६ | लातूर | रेणापूर न.पं. | ०९/०६/२०२२ |
| ७ | अमरावती | नांदगांव खंडेश्वर न.पं. | २९/११/२०२० |
| ८ | चंद्रपूर | नागभीड नगरपरिषद | १६/०६/२०२२ |
| ९ | चंद्रपूर | भिसी न.पं. | नवनिर्मित (२६/११/२०२१) |